MHRT080006332024	**नियमित दिवाणी दावा क्र.९३/२०२४ मधील निशाणी ०६ खालील आदेश**

सदरचा दावा हा प्रतिवादी क्र. १ ते १२ विरूध्द वाद मिळकतींचे **सरस-निरस-तुटक वाटप** होवून मिळण्याकरीता तसेच प्रतिवादी क्र. १ ते ३ विरूध्द **निरंतरची ताकीद मिळविण्याकरीता** दाखल केलेला आहे.

०२. नि. ६ खालील अर्जाअन्वये वादीने कथन केले की, दाव्याची चौकशी प्रलंबित असताना प्रतिवादी क्र. १ ते ३ दावा मिळकतीतील मिळकत क्रमांक १ मध्ये असलेले सामाईक घराचा काही भाग पाडून नविन घराचे बांधकाम अतिक्रमण करून करीत आहेत. त्यामुळे वादीचे पैशाचे स्वरूपात कधीही भरून न येणारे असे अपरिमित असे नुकसान होत आहे, सबब हा अर्ज दाखल केला आहे. गट क्रमांक ३३०/ब ही वादी व प्रतिवादींची मालकी आणि वहिवाटीची सामाईक मिळकत आहे. तसेच **ग्रामपंचायत ताम्हाणे घर नंबर १२०** हा देखील दाव्याचा विषय आहे. वादीनी तसेच वादीचा भाऊ रामचंद्र यांनी हयात असताना सदर मिळकतीमध्ये वडीलांच्या सांगण्यावरून स्वतंत्र घर बांधलेले आहे. मात्र ग्रामपंचायत घर क्रमांक १२० त्यांचे मुळ घर आहे, ज्यामध्ये देवघर आहे, ते घर जुने आहे. त्यामध्ये वादी व प्रतिवादींचा सामाईक हिस्सा आहे. आज देखील त्या घराला आणि वीज मिटरला वादीचे वडील सदाशिव सुतार यांचे नाव नमुद आहे.

०३. असे असताना प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी दि.०९/१२/२०२४ रोजी वादी आणि इतर प्रतिवादींची कोणतीही परवानगी न घेता त्या ठिकाणी बेकायदेशीर रित्या बांधकाम केले आहे आणि दर्शनी भागाचीच दिशा बदलली असल्याने वादीला

SHRUTI HANUMANTRAO PATIL

Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL
Date: 2025.02.28 13:50:52 +0530

मुळ घरात जाता येणे तसेच मुळ घराच्या पाठीमागील बाजुस जाणे शक्य होत नाही.

०४. प्रतिवादी क्र. १ ने २०१९ मध्ये देखील अशाच प्रकारे बेकायदेशीर घर बांधण्याचा प्रयत्न केला, त्यावेळेस वादीने ताम्हाणे ग्रामपंचायतीकडे दि.०३/०४ /२०१९रोजी हरकत अर्ज दाखल करीत बांधकाम थांबविले. परंतु त्यानंतर सहा वर्ष उलटून गेल्यानंतर देखील प्रतिवादी क्र. १ ते ३ पुन्हा बांधकाम सुरू करीत आहेत. दिवाणी न्यायालयास सुट्टी असल्याच्या कारणास्तव वादी सहजासहजी स्थगितीचा आदेश घेवू शकणार नाहीत, याची कल्पना असल्याने प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी जाणिवपूर्वक मुळ घराचा काही भाग पाडलेला आहे. त्यामुळे मुळ घराचे आडे कमकुवत झालेले आहे. तसेच वादीला त्याच्या घरातून बाहेर पडून मुळ घरात जाणे अशक्य झालेले आहे.

०५. प्रतिवादी क्र. १ ते ३ बांधत असलेल्या घराची लांबी रूंदी हे वाढवून बांधत असल्याने त्यांच्या हिश्यात येणा-या क्षेत्रापेक्षा जास्त जागेत नव्याने बांधकाम करीत आहेत. शिवाय सहहिस्सेदारांची परवानगी न घेता बांधकाम सुरू आहे. मुळ घराच्या चौथ-यावर न बांधता त्या घराचा बराचसा भाग अतिक्रमण करून वादीच्या सामाईक मिळकतीत प्रतिवादी क्र. १ ते ३ बांधत आहेत. दि. ०९/१२/२०२४ पासून वादीनी प्रतिवादी क्र. १ ला सदर घर कोसळू नये म्हणून नविन घर बांधण्यापासून वारंवार रोखले, मात्र प्रतिवादी क्र. १ ने दुर्लक्ष करीत वादी आणि त्याच्या पत्नीला वारंवार अश्लील शिवीगाळ केलेली आहे.

०६. वादीने ग्रामपंचातय ताम्हाणे येथे घराबाबत दि. १३/१२/२०२४ रोजी लेखी तक्रारी अर्ज दिला असून, त्यांनीही त्याबाबत कोणतीही कारवाई केली नाही. ग्रामसेवकांनी वादीला मासिक सभेच्या वेळेस त्यांच्या अर्जाचा विचार केला जाईल,

SHRUTI HANUMANTRAO PATIL

Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL
Date: 2025.02.28 13:51:04 +0530

असे आश्वासन दिले, सबब वादीला हा दावा दाखल करावा लागला.

०७. वादीतर्फे वकील श्रीम. पी. सी. चव्हाण यांनी युक्तीवाद केला की, वाद मिळकतीचे अदयाप न्यायालयामार्फत वाटप झालेले नाही. सबब प्रतिवादींना मनाई दिल्यास त्यांचे कोणतेही विशेष नुकसान होणार नाही. मात्र वादीच्या हक्क अधिकारांवर गदा येवू शकते व दाव्याचा मुळ उद्देशच नष्ट होवू शकतो. वाद मिळकतीत बांधकाम झाल्यास वादीच्या स्थावर मिळकती संबंधीत वारस हक्कावर गदा येवू शकते. सबब या अर्जाअन्वये तात्पुरत्या स्वरुपात प्रतिवादी क्र. १ ते ३ यांना तुर्तातुत ताकीद देण्यात यावी, अशी विनंती वादीनी केली.

०८. प्रतिवादी क्र. १ तर्फे विधीज्ञ श्री. सी. एम. मांगले यांनी **नि. ४२** येथे तुर्तातुर्त ताकीदीच्या अर्जावर म्हणणे दाखल करत अर्जास सक्त हरकत घेतली. प्रतिवादी क्र. १ ने वादीने दिलेली वंशावळ अपूर्ण असल्याचे सांगितले. शिवाय घर नंबर १२० हे पूर्वीचे असून सध्या त्या **घराचा क्रमांक १३१** असा आहे. हे घर दावा मिळकत क्रमांक १ मध्ये नसून ३ मध्ये आहे. मुळ देवघर हे वादीचे चुलते महादेव सुतार यांच्या घरात आहे व घर नंबर १२० मध्ये नाही.

०९. वादीची कधीही या घरामध्ये वहिवाट नव्हती. सन २०१९ मध्ये प्रतिवादी क्र. १ ने वादीकडे घर बांधण्यासाठी संमत्ती मागितली होती. मात्र वादीने नकार दिल्याने प्रतिवादी क्र. १ हिला जुन्या मोकळया व पडावयास आलेल्या घरात जिव मुठीत धरून रहावे लागले. प्रतिवादी क्र. १ ते ३ मुंबईहून गावी आल्यानंतर शेजारी रहाणारे अनंत गोपाळ यांच्याच घरात रात्री झोपायला जात असत. घर नंबर १३१ चा अन्यत्र नमुद केल्याप्रमाणे काही भाग नैसर्गिकपणे कोसळलेला आहे. तो भाग मुळ चौथ-याच्या उत्तर दिशेस असणा-या पडवीचा आहे. मुळ घर अजूनही मोडक्या

SHRUTI HANUMANTRAO PATIL

Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL
Date: 2025.02.28 13:51:12 +0530

तोडक्या अवस्थेत तग धरून उभे आहे. वादीला सन १९९४ साली सर्व भावंडांनी खर्चात सहभागी होवून स्वतंत्र घर बांधून दिले, ते घर नंबर १५७ स. नं. ३३० ब मध्ये आहे. सध्या ते घर फाडीच्या भिंतीच्या स्वरूपात आहे. सबब जुना घर क्रमांक १३१ मध्ये वादीची कधीही वहिवाट नव्हती.

१०. प्रतिवादी क्र. १ ते ३ हे मुंबईत रहायला असल्याने त्यांच्या गैरहजेरीत मुळ घराला वाळवी, कसर याचा त्रास होत आहे. प्रतिवादी क्र. १ ला मंगलोरी कौलासाठी दरवर्षी लाकडी रिपा बदलाव्या लागत असत. तिने वेळोवेळी घराची डागदुजी केलेली आहे. २०१४ साली घरकुल योजनेत सदाशिव यांच्या नावे सरकारकडून घरकुल मंजूर झाले होते. मात्र सदाशिव मयत असल्याने पुढील परवानगीसाठी वादी आणि प्रतिवादी क्र. ८ ते १२ यांची संमत्ती आवश्यक असल्याने त्यांनी जाणून बुजुन संमत्ती नाकारल्याने प्रतिवादी क्र. १ ला घर बांधता आले नाही. अशा परिस्थितीत २०१७ साली प्रतिवादीने पुन्हा त्या ठिकाणी नव्याने घर बांधण्यासाठी प्रयत्न सुरू केले. मात्र वादीने तंटामुक्ती समितीकडे तक्रारी अर्ज दिल्याने प्रतिवादी क्र. १ ला घर बांधण्यास परवानगी मिळाली नाही. परिणामत: घर अधिकच जिर्ण झाले आणि कोसळू लागले. त्यानंतरही प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी वादीकडे त्याची पत्नी आणि प्रतिवादी क्र. ८ ते १२ यांच्याकडे घर बांधणीसाठी संमत्ती मागितली. मात्र वादीने संमत्ती दिली नाही.

SHRUTI HANUMANTRAO PATIL

११. वादी घर क्रमांक १५७ येथे नव्याने घर बांधून कुटुंबासोबत राहतात. प्रतिवादींचे घर मोडकळीस आल्याने घर न बांधल्यास त्यांना उघडयावर रहावे लागणार आहे. वास्तवीक पाहता वादी व प्रतिवादी क्र. ८ ते १२ यांनी आपआपली घरे बांधलेली असल्याने आता प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी त्यांच्या रहिवासासाठी स्वतंत्र घर बांधल्यास वादी आणि प्रतिवादी क्र. ८ ते १२ यांचे कोणतेही नुकसान

Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL
Date: 2025.02.28 13:51:20 +0530

होणार नाही. प्रतिवादी क्र. ५ ते ७ यांनी प्रतिवादी क्र. १ ला मुखसंमत्ती दिलेली आहे. प्रतिवादी क्र. १ ला सांगितले की, अंतिम वाटपाच्या वेळी तु नव्याने घर बांधत असलेली घराखालील जागा आम्ही तुला दयायला तयार आहोत. अशा परिस्थीतीत स. नं. ३३०अ, ३३०ब, ३३०क या एकक्षेत्री तीन मिळकतीचे सुमारे ०.४०.६० हेक्टर क्षेत्रात प्रतिवादी क्र. १ ते ४ यांचा एकत्रात १/६ हिस्सा, प्रतिवादी क्र. ५ ते ७ यांचा प्रत्येकी १/६ हिस्सा, असा एकूण ४/६ हिस्सा प्रतिवादी क्र. १ ते ४ यांच्या हिश्यास ०.२६.८ हेक्टर क्षेत्र येणार असल्याने प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी कोणतेही अतिक्रमण करून घर बांधलेले नाही.

१२. वादीने हजर केलेल्या नकाशात घर क्रमांक १३१ मिळकत क्रमांक ३ मध्ये दिसून येत आहे. त्यामध्ये असलेले देवघर लाकडी असल्याने वाळवी आणि कसरीने तो पूर्णपणे पोखरला गेला आहे. वीजेचे बिल जरी वडीलांच्या नावे असले तरी प्रतिवादी क्र. १ ते ३ हेच ते नियमितपणे भरत आलेले आहेत. तसेच घरपट्टी आणि दस्त देखील सातत्याने प्रतिवादी क्र. १ चा पती आणि तिने भरलेला आहे. केवळ मुळ घरामध्ये देव आहेत असा आरोप करीत वादी हे प्रतिवादी क्र. १ ते ३ यांना घर बांधण्यास आडकाठी आणत आहेत. वादी स्वत: स्वच्छ हाताने न्यायालयात आलेले नसल्याने ते मागत असलेली दाद इक्वीटेबल स्वरूपाची नसल्याने अर्ज फेटाळण्यात यावा.

१३. वादीने दावा कलम ५ येथे स्पष्टपणे कबुल केले आहे की, २०१९ साली प्रतिवादीने नव्याने घर बांधण्यासाठी वादीकडे समंत्ती मागीतली होती, मात्र वादीने ती दिली नाही. सबब न्यायाचा समतोल हा प्रतिवादी क्र. १ ते ३ यांच्या बाजुने असल्याने अर्ज नामंजूर करण्यात यावा. सबब, वरीलप्रमाणे कथने करुन प्रतिवादीने अर्ज नांमजूर करण्यास विनंती केली आहे.

SHRUTI HANUMANTRAO PATIL

Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL
Date: 2025.02.28 13:51:27 +0530

१४. वादी तर्फे विधीज्ञा श्रीमती पी. सी. चव्हाण व प्रतिवादीतर्फे विधीज्ञ श्री. सी. एम. मांगले यांचा युक्तीवाद ऐकला.

१५. अर्जातील कथने दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकल्यानंतर खालील मुद्दे माझ्या विचारार्थ निश्चीत होतात व त्यांचे निष्कर्ष कारणांसह पुढीलप्रमाणे -

अ. क्र.	**मुद्दे**	**निष्कर्ष**
१.	*वादीस सकृतदर्शनी कथन आहे ?*	*होय*
२.	*सोयीचे समतोलत्व वादीच्या बाजूने आहे का ?*	*होय*
३.	*प्रस्तुत अर्ज नामंजूर केल्यास वादीचे नुकसान होईल का?*	*होय*
४.	*काय आदेश ?*	***अर्ज मंजूर करण्यात येतो.***

निष्कर्षाची कारणे

१६. दावा मिळकत क्रमांक १ ते ७ आणि ग्रामपंचायत ताम्हाणे घर क्रमांक १२० या मिळकती वादी आणि प्रतिवादी यांच्या वडीलोपार्जित मालकी वहिवाटीच्या आहेत आणि त्यांचे अदयाप वाटप झालेले नाही, ही बाब वादातित नाही.

१७. अर्जातील कथनांच्या पृष्ठयर्थ उभय पक्षकारांना कागदपत्रे व प्रतिज्ञापत्र तसेच इतर पुरावे हजर केलेले आहेत. ही सर्व कागदपत्रे मी पडताळून पाहिली.

मुद्दा क्र. ०१ करीता -

१८. वादीला प्रस्तुत दाव्याकामी सकृतदर्शनी कथन आहे का हे पाहत असताना वादीतर्फे दाखल कागदयादी नि. ५/१ ते ५/७ येथील गट क्रमांक ३३०अ, ३३०ब ,

SHRUTI HANUMANTRAO PATIL

Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL
Date: 2025.02.28 13:51:35 +0530

३३०क,३२०,१७८,१५९,३४२ च्या सातबारा उता-याचे अवलोकन केले असता, वादीसोबत इतर सहहिस्सेदारांची नावे भोगवटादार सदरी आहेत. तसेच वादी व्यतिरीक्त अन्यही लोक मालक आहेत. तसेच नि. ५/८ येथील नकाशाचे अवलोकन केले असता, दावा मिळकत क्रमांक ३, गट नंबर ३३० क येथे सदरचे घर असल्याचे दिसून येते. वादीने नि.५/९ येथे दाखल केलेल्या ग्रामपंचायतीच्या नावच्या दि.१३/१२/२०२४ रोजीच्या तक्रारी अर्जावरून असे दिसून येते की, त्यांनी ग्रामपंचायतीला सदरचे बांधकाम सहहिस्सेदारांच्या परवानगी शिवाय सुरू असल्याचे कळविले होते. तसेच बांधकामास संमत्ती नसल्याने ते तत्काळ थांबविण्यात यावे असेही कळविले होते. वादीने नि. ५/११ येथील सन १९९४-९५ सालच्या कर आकारणीच्या यादीचा सहिसूद उतारा दाखल केला आहे, ज्यामध्ये सदरचे घर मुळ पुरूष सदाशिव सुतार यांच्या नावे असल्याचे दिसून येते.

१९. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांच्यातर्फे नि. ६४ येथे कागदयादी दाखल करण्यात आली असून त्यांनी सन २००५-०६,२००९-१०,२०१०-११,२०११-१२,२०१२-१३,२०१३-१४------२०२३-२४ पर्यतच्या घर क्रमांक १३१ च्या कर भरल्याच्या मुळ पावत्या दाखल केलेल्या आहेत. तसेच सन २०२४-२५ सालचा कर आकारणी नोंदवहीचा उतारा ज्याला **सदाशिव सुतार** यांचे नाव दाखल आहे असा दाखल केला आहे. शिवाय कागदयादी नि. ६४/१५ येथे दि. ०४/०३/२०२२ रोजी प्रतिवादी क्र. १ ने सरपंच ताम्हाणे यांना दिलेला अर्ज दाखल केलेला आहे. शिवाय प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी एप्रिल २०२० पासून जानेवारी २०२५ पर्यत वीजमिटर क्रमांक २२३६६००००२१५ यांचे बिल भरत असल्याबाबत त्याच्या प्रति दाखल केलेल्या आहेत.

SHRUTI HANUMANTRAO PATIL

२०. वादीतर्फे विधीज्ञ श्रीमती पी. सी. चव्हाण यांनी युक्तीवाद केला की, सदर मिळकतीचे अदयापही वाटप झालेले नाही. त्यामुळे कोणत्याही सहहिस्सेदारांचे हिस्से

Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL
Date: 2025.02.28 13:51:41 +0530

न्यायालयामार्फत ठरविलेले नाहीत. अशा परिस्थीतीत प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी सदरचे बांधकाम पूर्ण केल्यास दावा मिळकतीचे मुळ स्वरूप बदलू शकते. शिवाय वडीलोपार्जित घराचा काही भाग कोसळून प्रतिवादी क्र. १ ते ३ बांधकाम करीत आहेत.

२१. उलटपक्षी प्रतिवादी असे कथन करतो की, दावा मिळकतींमध्ये घर बांधण्यापूर्वी अनेकदा त्यांने वादीकडून आणि इतर सहहिस्सेदारांकडून परवानगी मागितली. मात्र परवानगी दिली नसल्याने प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी सदरचे घर बांधायला सुरूवात केली. इतर सहहिस्सेदार त्याच्या स्वतंत्र घरात कुटुंबासोबत राहतात. शिवाय बांधकाम पूर्ण झाल्यास प्रतिवादीला वाटपाअंती येणा-या हिश्यातच तो वहिवाट करणार आहे. यामध्ये कोणतेही अतिक्रमण केलेले नाही.

२२. वादी आणि प्रतिवादी दोघांनीही ग्रामपंचायत घर क्रमांक १२० सध्या घर क्रमांक १३१ हे मुळ घर वडीलोपार्जित असल्याचे मान्य केले आहे. मिळकतीचे वाटप झाले नाही, ही बाब ही वादातीत नाही. त्यामुळे दावा मिळकत ही प्रतिवादी क्र. १ ते ३ यांच्या वाटणीला आली आणि त्यामध्ये त्यांची वहिवाट आहे असे दाखविणारा सकृत दर्शनी एकही कागद प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी दाखल केला नाही. शिवाय सदर घराच्या बांधकामास ग्रामपंचायतीची परवानगी असल्याबाबत देखील प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी कागदोपत्री पुरावा दाखल केला नाही. सदरचे घर मोडकळीस आल्याने व अभिलेख सदरी अदयापही ते मुळ पुरूष सदाशिव सुतार यांच्या नावे असल्याने वादी प्रतिवादी दोघांचाही एकमेव कब्जा त्यावर दिसून येत नाही. सबब प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी ज्याप्रकारे कथने केली आहेत त्यांच्या पुष्टयर्थ प्रतिवादी क्र. १ ते ३ यांच्याकडे सकृतदर्शनी कथन नाही. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांच्या म्हणण्यानुसार प्रतिवादी क्र. ५ ते ७ यांनी त्यांना घर बांधण्यास तोंडी संमत्ती दिलेली आहे. सबब कायदेशीररित्या येणा-या हिश्याच्या क्षेत्रातच ते घर बांधत आहेत. मात्र लेखी पुराव्याच्या अभावी सदरची कथने शाबीत होत नाही.

SHRUTI HANUMANTRAO PATIL

Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL
Date: 2025.02.28 13:51:49 +0530

२३. एकूणच अविभाजीत अशा वडीलोपार्जित मिळकतीचे वाटप होण्यापूर्वीच प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी इतर सहहिस्सेदारांची परवानगी न घेता, ग्रामपंचायतीची परवानगी न घेता घराचे बांधकाम सुरू केले असे प्रथमदर्शनी दिसून येते. सबब मुद्दा क्रमांक १ बाबत मी होकारार्थी निष्कर्ष नोंदवित आहे.

मुद्दा क्रमांक २ व ३ करिता

२४. **सोयीच्या समतोलत्वाचा** मुद्दा तसेच **न भरून येणारे नुकसान कोणाची होईल** हा मुद्दा पहात असताना, मुद्दा क्रमांक १ चा निष्कर्ष बाजुला ठेवला जावू शकत नाही. वादीने सकृतदर्शनी कथने यापूर्वीच शाबीत केलेले आहे. वादीने दाखल केलेल्या कागदयादी नि. ०५/०९ येथील तक्रारी अर्जावरून असे दिसून येते की, वादीने ग्रामपंचायतीकडे सदर बांधकामाविषयी हरकत घेतलेली होती मात्र त्याबाबत कोणतीही कारवाई झाली नाही. अशा परिस्थितीत जर प्रतिवादी क्र. १ ते ३ यांना घर बांधण्यास तुर्तातुर्त ताकीद दिली नाही तर वादीने घर बांधकामाबाबत आक्षेप नोंदविलेला असताना प्रतिवादीला न्यायालयीन परवानगी दिल्यासारखी होईल. त्यामुळे या परिस्थीतीत अर्ज मंजूर करणे योग्य ठरते. म्हणजेच सोयीचे समतोलतत्व वादीचे बाजुने आहे. जर अर्ज मंजूर केला नाही, तर वडीलोपार्जित मिळकतींच्या मुळ स्वरूपात बदल होईल. अदयाप कोणत्याही सहहिस्सेदांराचे हिस्से ठरलेले नाहीत. ज्याअर्थी प्रतिवादी क्र. १ ते ३ सकृतदर्शनी दावा मिळकतीत त्यांचा एकमेव कब्जा असल्याचे दाखवू शकले नाहीत त्याअर्थी कोणतेही नुकसान होण्याचे कारण नाही. सबब अर्ज नामंजूर केल्यास वादीचे न भरून येणारे नुकसान होईल त्यामुळे वरील सर्व गोष्टीचा विचार करता मुद्दा क्रमांक २ व ३ बाबत मी वादीच्या बाजुने निष्कर्ष नोंदावित आहे.

SHRUTI
HANUMANTRAO
PATIL

Digitally signed by
SHRUTI
HANUMANTRAO PATIL
Date: 2025.02.28
13:51:57 +0530

<u>मुद्दा क्र. ०४ बाबत</u>

२५. उपलब्ध पुरावा, दोन्ही बाजुचे विधीज्ञांचा युक्तीवाद पाहता वादी सकृतदर्शनी कथन आहे. तसेच सोयीचे समतोलतत्व आणि नुकसानीचे तत्व वादीचेच बाजुने आहे हे सिध्द झाले आहे, त्यामुळे अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. सबब मुद्दा क्रमांक ४ चा निष्कर्ष खालीप्रमाणे नोंदविण्यात येत आहे.

<u>आदेश</u>

०१.	नि. ०६ वरील अर्ज मंजूर करण्यात येतो.
०२.	मुळ दाव्याचा निकाल लागेपर्यत प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी स्वत: अगर त्रयस्थामार्फत वादीच्या शांततामय कब्जा वहिवाटीस हरकत अडथळा निर्माण करू नये तसेच सुरू असलेले बांधकाम त्वरीत थांबवावे तसेच कोणत्याही स्वरूपाचे बांधकाम ज्यामुळे सामाईक घर क्रमांक १२०/नवा घर क्रमांक १३१ ला धोका पोहचेल असे बांधकाम करू नये, असा तात्पुरता मनाई आदेश वादीच्या हक्कात देण्यात येतो.
०३.	अर्जाचा खर्च मुळ दाव्यात समाविष्ट समजण्यात यावा.

SHRUTI HANUMANTRAO PATIL

Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL
Date: 2025.02.28 13:52:07 +0530

स्थळ - देवरुख
दिनांक २८/०२/२०२५

(श्रुती ह.पाटील)
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर
देवरुख